जिल्हाधिकारी, रत्नागिरी

महाराष्ट्र राज्य सेवा [वैद्यकीय देखभाल] नियम, १९६१ च्या नियम २[५] खाली शासकीय कर्मचाऱ्यांच्या व त्यांच्या कुटुंबियांच्या कॅन्सरवरील औषधोपचारांसाठी महाराष्ट्रातील संस्थांना मान्यता.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्र. एमएजी १०८६/४९०७/आ. ९
मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२, दिनांक :१/९/१९८७.

शासन निर्णय :-

शासन निर्णय, नगरविकास व सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. एमएजी१००१/७८२७/पी, दिनांक २५/८/१९७१ अनुसार शासकीय कर्मचाऱ्यांना व त्यांच्या कुटुंबियांना कॅन्सरवरील आजारासाठी औषधोपचार घेण्यासाठी टाटा रुग्णालय, मुंबई या संस्थेस मान्यता देण्यात आली आहे. परंतु असे आढळून आले आहे की, महाराष्ट्राच्या निरनिराळ्या भागात रहाणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांना व त्यांच्या कुटुंबियांना मुंबईमध्ये औषधोपचारांसाठी येणे सर्वच दृष्टीने गैरसोयीचे होते. शिवाय शासकीय रुग्णालयांमध्ये कॅन्सरवरील औषधोपचाराची अद्ययावत अशी सोय उपलब्ध नसल्यामुळे त्यांना नजीकच्या खाजगी रुग्णालयात औषधोपचार घ्यावे लागतात. तो खर्च शासकीय कर्मचाऱ्यास परवडण्यासारखा नसतो व त्यासाठी झालेल्या खर्चाची प्रतिपूर्ती मिळत नाही म्हणून शासकीय कर्मचाऱ्यांची उपरोल्लेखीत अडचण लक्षात घेता शासकीय कर्मचाऱ्यांच्या व त्यांच्या कुटुंबियांच्या कॅन्सरवरील औषधोपचारांसाठी टाटा रुग्णालय मुंबई खेरीज महाराष्ट्रातील पुढील संस्थांना याव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

१] बालाभाई नानावटी रुग्णालय, मुंबई.
२] कॅन्सर रिलीफ सोसायटी, नागपूर.
३] अश्विनी रुरल कॅन्सर रिसर्च ॲण्ड रिलीफ सोसायटी, बार्शी.
४] श्री. सिध्देश्वर कॅन्सर हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सोसायटी, सोलापूर.
५] इंडियन कॅन्सर सोसायटीच्या महाराष्ट्रातील सर्व संस्था.

३. शासकीय कर्मचाऱ्यास उपरोल्लेखीत संस्थांमधील औषधोपचारांच्या खर्चाची प्रतिपूर्ती देताना ती टाटा रुग्णालय, मुंबई येथील दरांइतकी सीमित करुन देण्यात यावी.

४. हे आदेश ते निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

५. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या संमतीने त्यांचा अनौपचारिक संदर्भ क्र. ७४२/८७/सेवा ५, दिनांक ४/८/८७ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

१९८७

[आर. गोपाल]
सह सचिव महाराष्ट्र शासन

SEP 1987

प्रति,
सचिव, राज्यपाल, महाराष्ट्र शासन